# ठाणेनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३७ /२०२५ दि.१४/१०/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक १८/१०/२०२५ ते दिनांक २३/१०/२०२५ या कालावधीत दिपावली सण साजरा होणार आहे. ठाणेनगर वाहतुक उपशाखेच्या हद्दीत मोठी बाजारपेठ असुन दिपावली सणाच्या निमित्ताने मोठया प्रमाणात खरेदी साठी लोकांची गर्दी होत असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** जांभळी नाक्याकडुन बाजारपेठेत जाणाऱ्या सर्व वाहनाना **जांभळीनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ही जांभळीनाका येथून उजवीकडे वळण घेवून टॉवरनाका मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** खारकर आळी कडून बाजारपेठ जांभळीनाका कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **महाजनवाडी हॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ही खारकर आळी कडुन येऊन ठामपा व्यायाम शाळा येथुन महाजन वाडी हॉल लगत उजवीकडे वळुन एन.के.टी.कॉलेज मार्गे कोर्ट नाक्यावरुन पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** ठाणे ट्रेडर्स दुकानाकडुन महमंद अली रोडने जाभंळीनाका बाजुकडे येणारी मोटार सायकल वगळून सर्व वाहनांना **ठाणा ट्रेडर्स** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ठाणे ट्रेडर्स दुकानाकडुन उजवीकडे वळुन महागिरी मशीदकडून वळुन इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **४)** दादोजी कोंडदेव स्टेडीयमकडुन बाजारपेठ कडे येणाऱ्या सर्व वाहनाना **जवाहर बाग, अग्निशमक केंद्र** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ही जवाहर बाग, अग्निशमक केंद्र कार्यालय येथुन राघोबा शंकर रोड मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **५)** अशोक सिनेमा व नॅशनल इलेक्ट्रॉनिक कडुन बाजारपेठेत जाणाऱ्या मोटार सायकल वगळून सर्व वाहनांना **माटे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ही नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स येथुन उजवीकडे वळून दत्त मंदिर कडुन सिडको स्टॅण्ड कडुन इच्छित स्थळी जातील. |

**सदर वाहतूक अधिसूचना दिनांक १८/१०/२०२५ रोजी पासुन ते दिनांक २३/१०/२०२५ रोजी दुपारी १४:०० वा. ते रात्रौ २३:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रत माहितीसाठी,**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, पो.नि. ठाणेनगर वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.